## बोदवड महाविद्यालयात राज्यस्तरीय चर्चासत्राचे आयोजन

# ग्रामीण भागतील महिलांचे जीवनमान उंचावणे व त्यांच्या व्यक्तिमत्वाचा विकास होणे हि काळाची गरज

- उदघाटक सौ.साधना महाजन नगराध्यक्षा




राज्य महिला आयोग, मुंबई प्रायोजित आणि कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, बोदवड आयोजित राज्यस्तरीय चर्चासत्राचे आयोजन महाविद्यालयात दि. १३ ऑक्टोबर २०१८ रोजी आयोजित करण्यात आले होते. चर्चासत्राचा “ग्रामीण महिला: आरोग्य आणि सुरक्षा जनजागृती” हा विषय होता राज्यस्तरीय चर्चासत्राचे उदघाटन जामनेर नगर परिषदेच्या नगराध्यक्षा सौ. साधनाताई महाजन यांचे हस्ते सकाळी ९.३० वाजता संपन्न झाले. अध्यक्षस्थानी राज्य महिला आयोगाच्या सदस्या सौ. देवयानी ठाकरे होत्या तर प्रमुख अतिथी म्हणून जिल्हा परिषदेच्या महिला व बाल कल्याण सभापती सौ.रजनीताई चव्हाण, राज्य महिला आयोगाचे जिल्हा सचिव अॅड.पियुष गढे बोदवड नगर पंचायतच्या नगराध्यक्षा मुमताज बी सईद बागवान आणि बोदवड सार्व.को.ऑप.सोसायटीचे अध्यक्ष श्री.मिठूलालजी अग्रवाल इ.मान्यवर उपस्तीत होते. या सोहळयास संस्थेचे उपाध्यक्ष श्री. अजय जैन, सचिव श्री विकासजी कोटेचा यांच्यासह संस्थेचे संचालक, पत्रकार, विविध शाळांचे मुख्याध्यापक, मुंबई, पुणे, डोंबिवली,कांदिवली,अैरोली,नाशिक,संगमनेर,मुक्ताईनगर,रावेर,जामनेर,भुसावळ,यावल,कुऱ्हाकाकोडा,बीड,सांगली,आश्ठी,चाळीसगाव,जळगाव, अमळनेर, औरंगाबाद, नागपूर, हिंगणघाट, मलकापूर, वरणगाव, नंदुरबार इत्यादी ठिकाणाहून उपस्थिती उपस्थिती होती

या चर्चासत्रात बोदवड तालुक्यातील सुमारे १२० अंगणवाडी सेविका व अशा संस्थेच्या कार्यकर्त्या यांना निशुल्क प्रवेश देण्यात आलेला होता.

ग्रामीण भागतील महिलांचे जीवनमान उंचावणे व त्यांच्या व्यक्तिमत्वाचा विकास होणे हि काळाची गरज असून त्यासाठी राज्य महिला आयोगाचे कार्य अभिनंदनीय आहे असे वक्तव्य उदघाटक सौ.साधना महाजन नगराध्यक्षा जामनेर नगर परिषद यांनी केले. महिलांची कहानी मुलीच्या जन्मापासून सुरु होते आणि मृत्यूच्या शय्येवर संपते. अनेक प्रकारच्या समस्या अडचनी आव्हाने महिला सहन करत आल्या आहेत व करत आहेत. राज्य महिला आयोगाच्या या धाडसी योजनांमुळे महिलांना न्याय मिळेल असा विश्वास कार्यक्रमाच्या प्रमुख अतिथी सौ.रजनीताई चौहान, सभापती महिला व बालकल्याण विभाग जिल्हा परिषद जळगाव यांनी व्यक्त केला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षा राज्य महिला आयोगाच्या सदस्या सौ.देवयानी ठाकरे यांनी राज्य महिला आयोगाचे ध्येय, उद्देश व कार्यपद्धती या बाबत उपस्थितांना सविस्तर माहिती देऊन आयोगाच्या विविध योजना, तसेच महिलांसाठीचे देशातील विविध कायदे कसे उपयुक्त आहे व त्यासाठी महिलांनी कायद्याचा कसा लाभ घ्यावा याबाबतचे मार्गदर्शन करून राज्य सरकारच्या माध्यमातून महिला आयोग पिढीत महिलांना कसे सहकार्य, पाठींबा व शक्ती देते याचे उदाहरणासह विवेचन केले.

दिवसभर चालणाऱ्या या चर्चासत्रात ग्रामीण भागातील महिला, त्यांचे आरोग्य व त्यांची आरोग्य व त्यांची सुरक्षा याबाबत कशी काळजी घ्यावी याचे मार्गदर्शन करणेसाठी प्रथम सत्रात सकाळी १०.३० वाजता जळगाव येथील जिल्हा न्यायालयाच्या अॅड. मंजुताई वाणी यांचे “हिंदू वारसा हक्क व कायदा १९५४” या विषयावर व्याख्यान झाले. सत्राध्यक्ष म्हणून बोदवड येथील ज्येष्ठ पत्रकार श्री.पुरुषोत्तम गड्डम हे होते. या सत्रात भारतातील महिलांसाठीच्या विविध कायद्यांचा मोठा आधार महिलांसाठी उपलब्ध आहे परंतु ज्या प्रमाणात कायद्याचा वापर महिलांनी करणे अपेक्षित आहे तसे चित्र नाही. महिलांचे कुटुंबातील

स्थान आणि त्यासाठी हिदू वारसा हक्क कायदा कसा महत्वाचा आहे त्याद्वारे महिला कश्या सुरक्षित राहू शकतात, आर्थिक सामाजिक कौटुंबिक व मानसिक दृष्ट्या कश्या सक्षम होऊ शकतात याबाबत सविस्तर माहिती आपल्या व्याख्यानातून दिली.

दुसऱ्या सत्रात सकाळी ११.४५ वाजता “महिला शारीरिक आजार” या विषयावर बोदवड येथील गुरुदेव रुग्णालयाच्या डॉ.वृषाली चौधरी यांनी मार्गदर्शन केले तर सत्राध्यक्ष म्हणून पाचोरा येथील डॉ.अनुजा देशमुख यांनी काम पाहिले या सत्रात महिलांचे शारीरिक आरोग्य मौन व उपाययोजना या यासंदर्भात बोलायचे झाल्यास आरोग्य हे मनाशी संबधित असते मनाची समृद्धी, सात्विकता याचा परिणाम आपल्या शरीरावर होत असतो सकारात्मक विचारांचा प्रभाव हा आपल्या आयुष्य बरोबर आपल्या आपल्या शरीरावर दिसून येतो. नकारात्मक विचारांनी शरीराच्या पेशींचे संतुलन बिघडते म्हणून स्वास्थ शरीराची अपेक्षा आपण करत असू तर आपले मन सुद्धा आपणास स्वछ ठेवावे लागेल. आज धकाधकीच्या काळात शारीरिक स्वास्थ सांभाळणे अतिशय गंभीर विषय झालेला आहे. आणि म्हणून शारीरिक आजारांचे प्रमाण हे वाढलेले आपल्याला आढळून येते. अलीकडच्या काळात लाईफस्टाईल आजार हि मोठ्या प्रमाणात आढळून येतात त्यात मधुमेह हे एक ज्वलंत उदाहरण आहे त्याच प्रमाणे कॅन्सर सुद्धा याच प्रमाणे स्त्रियांमध्ये बऱ्याच प्रमाणात बघायला मिळतो. काही गोष्टींची अपूर्ण माहिती हि या आजारांना आमंत्रण देवू शकते जसे गर्भनिरोधक गोळयांचा अनियंत्रित वापर,संतुलित आहाराची कमतरता याचा परिणाम शरीरावर होतो अशी माहिती आपल्या व्याख्यानातून दिली

चर्चासत्रात तिसऱ्या सत्रात दुपारी २.०० वाजता “महिलांचे मानसिक आजार, लक्षणे आणि उपाय योजना” या विषयावर जळगाव येथील भक्ती मानसोपचार केंद्राच्या प्रमुख डॉ.कीर्ती देशमुख या मार्गदर्शन केले. तर सत्राध्यक्ष म्हणून अशा संस्थेच्या पर्यवेक्षक सौ. दमयंती इंगळे यांनी काम पहिले.आपल्या व्याख्यानात डॉ.करती देशमुख यांनी महिलांना कमी अधिक प्रमाणात मानसिक आजाराने ग्रासलेले असते. सतत होणारे अन्याय, निर्णय न घेण्याचे बंधन, विश्वासात न घेणे बोलण्याची परवानगी नसणे सातत्याने झिडकारणे या कारणांनी महिलांच्या मानसिकतेवर परिणाम होऊन मानसिक आजारास महिला बळी पडतात, विशेषतः ग्रामीण भागात मानसिक आजाराचे प्रमाण जास्त असल्याचे जाणवते. असे अनेक संदर्भ देऊन उपस्थितांना मार्गदर्शन केले.

मानसिक आजार हे तात्पुरत्या स्वरूपाचे असतात, वेळीच तज्ञांना भेटल्यास काही काळातच महिला आनंदी होऊ शकतात राज्य महिला आयोगाच्या माध्यमातून महिलांच्या विविध विषयांवर चर्चा घडून येतेय व जनजागृती होतेय याचा खूप आनंद होत आहे.राज्य महिला आयोगाच्या या जनजागृतीमुळे महिला सुखी समाधानी व आनंदी होतील असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

चौथ्या सत्रात दुपारी ३.१५ वाजता महिला विषयक विविध कायद्यांचा आढावा प्रा. डॉ.रुपाली तायडे यांनी घेतला. सत्राध्यक्ष म्हणून नाहटा महाविद्यालय भासवळ येथील डॉ.स्मिता चौधरी या होत्या. आपल्या व्याख्यानात डॉ.तायडे यांनी महिलांसाठी स्वरक्षा म्हणजेच सुरक्षा आहे. महिलांनी दक्ष व सज्ज राहिले पाहिजे. ओळख नसलेल्या व्यक्तींना संपूर्ण माहिती मिळाल्याशिवाय घरी व बाहेर स्वतःची माहिती उघाल करू नये. सार्वजनिक ठिकाणी दक्षपूर्वक वावरणे गरजेचे आहे. प्रसार माध्यमांचा उपयोग करतांना अनोळखी व्यक्तींना आपल्या ग्रुपमध्ये अॅड करू नये. सायबर क्राईम बद्दल जाणून घेणे महत्वाचे होय. आपला फेसबुक किंवा अन्य पासवर्ड कुणालाही सांगू नये. सायबर क्राईमच्या अंतर्गत जन्मठेप पर्यंतची शिक्षा दिली जाऊ शकते. संपूर्ण जगात क्राईमला अति महत्व देण्यात येत आहे. भारतात सायबर क्राईम कायदा सन २००० मध्ये लागू करण्यात आला. आणि त्यानंतर त्यात २००८ मध्ये आणखी संशोधन करण्यात आलेले आहे. त्यात पुढे २०११ मध्ये IT नियम ही लागू केले गेले.

हैकींग –तुमच्या मोबाईल किंवा कॉम्प्युटरच्या सिस्टिमला अनधिकृतपणे डेटयाची छेडछाड करणे. कायदा - २००८ च्या अंतर्गत कारवाई करू शकता. अपराध सिध्द झाल्यास ३ वर्ष शिक्षा व ५ लाखापर्यंत दंड

डेटाची चोरी - भारतीय संविधान हे समानता, बंधुता व धर्मनिरपेक्षता यांचे प्रतिक म्हणून संपूर्ण जगात ओळखले जाते. महिलांसाठी सन १९१९ मध्ये राजश्री शाहू महाराज यांनी आपल्या ‘रयत संस्थानात’ महिलांसाठी कायदे अमलात आणले.

पाचव्या सत्रात दुपारी ४.३० वाजता प्राचार्य डॉ.अरविंद चौधरी यांच्या प्रमुख उपस्थितीत दिवसभर झालेल्या विविध व्याख्यानांच्या संदर्भात व महिलांच्या समस्या संदर्भात खुल्या चर्चेचे आयोजन करण्यात आलेले होते. महिलांसाठी विविध समस्यांवर आधारित प्रश्नावली तयार करण्यात आली होती त्यानुसार प्रत्येक प्रश्नाच्या बाबत उपस्थित महिला व विद्यार्थिनी यांचा अभिप्राय नोडवून घेण्यात आला.

राज्यस्तरीय चर्चासत्राचा समारोप समारंभ सायंकाळी ५.०० वाजता बोदवड सार्व.को.ऑप.सोसायटीचे सचिव श्री.विकासजी कोटेचा,प्राचार्य डॉ अरविंद चौधरी उपप्राचार्य श्री डी.एस.पाटील, चर्चासत्र सचिव डॉ.गीता पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाला.

राज्यस्तरीय चर्चासत्रासाठी प्राचार्य डॉ.अरविंद चौधरी यांचे मार्गदर्शनाखाली प्रा.रत्ना जावरास, डॉ. अपर्णा चंद्रास, डॉ.कामिनी तिवारी, प्रा.हेमलता कोटेचा, डॉ.रुपेश मोरे,डॉ.अनिल बारी, डॉ.मधू खराटे, डॉ.मनोज निकाळजे, श्री.बाबुराव हिवराळे, सर्व प्राध्यापक शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.




